दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
बीड/महाराष्ट्र | गुरुवार ३० मे २०२४ | आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ | वर्ष १ ले | अंक २९२ | पाने ४ | किंमत ४ रुपये

# मी महाराष्ट्रातील जनतेची माफी मागतो, आंबेडकरांचं पोस्टर फाडण्याबाबत जितेंद्र आव्हाडांचं स्पष्टीकरण

**मनुस्मृतीचे दोन श्लोक शालेय अभ्याक्रमात घेतल्याने याच्या निषेध करण्यासाठी आमदार जितेंद्र आव्हाड महाडमधील चवदार तळ्यावर गेले होते त्या ठिकाणी त्यांच्याहातून आंबेडकर यांचं पोस्टर फाडलं गेल्याने त्यांच्यावर टीका होत आहे.**





राज्य सरकारने शालेय अभ्यासक्रमामध्ये मनुस्मृतीमधील दोन श्लोकांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा राज्यभरातून विरोध केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर शरद पवार गटाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी महाडमधील चवदार तळ्याच्या ठिकाणी जात मनुस्मृती दहन करत निषेध नोंदवला. यादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं पोस्टर फाडलं गेलं, यामुळे राज्यभरातून आव्हाडांवर टीका होत आहे. मात्र जितेंद्र आव्हाड यांनी यावर स्पष्टीकरण देताना महाराष्ट्रातील जनतेची माफी मागितली आहे. काय म्हणाले जितेंद्र आव्हाड? आम्ही महाडला मनुस्मृती दहन करण्यासाठी आलो होतो. कारण ज्या मनुस्मृतीमधे महिलांच्या संदर्भात अत्यंत खालच्या भाषेत लिहण्यात आलं आहे, त्या मनुस्मृती मधील श्लोक जर पाठ्यपुस्तकात येत असेल तर आम्ही त्याचा विरोध करत असताना अनावधानाने माझ्याकडून आणि माझ्या कार्यकर्त्यांकडून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पोस्टर फाडण्यात आले. त्यासंदर्भात मी महाराष्ट्रातील जनतेची माफी मागतो आणि मी कधी माझ्या भूमिके पासून मागे हटत नाही पण आता मी माफी मागत आहेत त्यामुळे यामागची भावना आपण समजू शकता, असं जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे.

जाहीर निषेध !जाहीर निषेध! स्टंटबाजीच्या नादात डॉक्टर जितेंद्र आव्हाड यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो फाडलेत. स्टंटबाजीत आपण काय मूर्खपणा केला हेही आव्हाडांच्या लक्षात येऊ नये आंबेडकर प्रेमी म्हणून या घटनेचा जाहीर निषेध! आव्हाडांनी तात्काळ देशाची माफी मागावी, अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते आणि आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे.

## वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या सौर पॅनलचे नुकसान



**केज प्रतिनिधी**

केज तालुक्यातील लाखा येथील शेतकरी विठ्ठल नारायण उमाप यांची जमीन लाखा गावात गट नंबर ५० मध्ये आहे त्यामध्ये विठ्ठल नारायण उमाप यांच्या रानातील जीके कंपनीचे सौर पंप पूर्णपणे नैसर्गिक आपत्ती पावसामुळे बसवलेल्या जागेपासून दहा फूट अंतरावर उपटून पडलेले आहे . त्यांचा पूर्ण सेट खराब झालेलाआहे तरी जीके कंपनीने लवकरात लवकर याची दखल घेऊन नवीन सौर पॅनल बसून द्यावा. अशी मागणी शेतकरी विठ्ठल नारायण उमाप यांनी केली

## एकल मातांचा हिरकणी पुरस्कार देऊन सन्मान

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे/ पंकज भंडारी**

पुणे :- पतीच्या निधनानंतर पतीच्या विरहाचे दुःख तर असतेच पण ते बाजूला ठेवून मुलांच्या शिक्षणाची , कुटुंबाची तसेच आर्थिक अशी पूर्ण जबाबदारी एकट्या स्त्रीवर येते. ह्या सर्व जबाबदाऱ्या एकल माता यशस्वीरित्या पार पाडत मुलांना उच्च शिक्षण देतात. अशा एकल मातांच्या कर्तृत्वाचे कौतुक व्हायलाच पाहिजे म्हणून वसुंधरा परिवार सोशल फाउंडेशनच्या संस्थापिका योगितताई गोसावी यांनी या एकल मातांना मान्यवरांच्या हस्ते हिरकणी पुरस्कार देऊन सन्मानित केले. यावेळेस महिलांसाठी फॅशन वॉक व संगित खुर्ची स्पर्धा आयोजित केली होती. महिलांनी उत्स्फूर्तपणे अतिशय मोठ्या संख्येने सहभाग घेतला व खूप एन्जॉय केले.




संजीवनी कोंडे देशमुख, अश्विनी निकम, मयुरी कदम, रितू पाटील, उषा वाणी, सुषमा मोरे व बाल कलाकार वैष्णवी महाडिक या सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे वितरण करण्यात आले. आमदार मा रविंद भाऊ धंगेकर यांच्या पत्नी मा प्रतिभाताई धंगेकर यांनी महिलांना पर्यावरणाचे महत्त्व सांगून जास्तीत जास्त वृक्षारोपण करण्यास सांगितले. या कार्यक्रमात फिल्म प्रोड्युसर हिरेन वैद्य, फिल्म डिरेक्टर शैलेंद्र निर्मळे, सूर्योदय वृद्धाश्रमच्या संस्थापिका छायाताई भगत, आनंद कुटुंबाच्या संचालिका मिलनताई पवार, सामाजिक कार्यकर्त्या एलिस लोबो, कलाकार संगिता पिंगळे व अनिता चव्हाण आदि मान्यवर उपस्थित होते. मलाबार गोल्ड अँड डायमंडच्या स्टोअर मॅनेजर दिक्षा देसाई मॅडम व फिल्म प्रोड्युसर हिरेन वैद्य सर यांनी या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले याबद्दल मनापासून धन्यवाद.

## पुण्यातील कल्याणी नगरातील अपघातानंतर आता पैठणमध्ये सुध्दा हिट अँन्ड रन

**दैनिक वादळ वार्ता**
**पैठण/चैताली औटे**


एका राजकीय पक्षाच्या पैठण मधील पदाधिकाऱ्यांनी भरधाव कारणे दुचाकीस्वार बापलेकाला उडवले. जखमींना मदत करण्याऐवजी घटनास्थळावरून पळ काढला .ही घटना पैठण तालुक्यातील येथे सोमवारी (२७) मे रोजी रात्री आठच्या सुमारास घडली.पुण्यातील कल्याणीनगरात बिल्डर पुत्राच्या भरधाव कारने दोघांचे बळी घेतल्याची घटना सध्या राज्यात चर्चेत असतानाच पैठण मध्येही हिट अँन्ड रन ची घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. इसाक यासीन शेख वय (50) व त्यांचा मुलगा आयान शेख (दोघे रा.तारु पिंपळवाडी) अशी जखमींची नावे आहेत. ते नातेवाईकांच्या लग्नावरून घरी परतत होते. पैठण तालुक्यातील ढाकेफळ- वडगाव मुलानी रोडवर एम एच २० ईजे३०३१या क्रमांकाच्या कारने त्यांना उडवले.




यात जखमी झाल्याने सध्या त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. कारच्या नंबर वरून ती राजकीय पदाधिकाऱ्याची असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणात अद्याप जखमींनी तक्रार दिलेली नाही .तक्रार दिल्यानंतर पुढील कारवाई करू असे बिडकीन पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रमोद पाटील यांनी पत्रकारांना सांगितले.

## प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे या शाळेचा दहावी परीक्षेचा निकाल 97.22 टक्के

प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे या शाळेचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ९७.२२ टक्के



लागला या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्रकाश (आणा ) गोरे सचिव संजय अभिमन्यू घाडगे मुख्याध्यापक पांडुरंग यादव यांनी अभिनंदन केले.कु. राजनंदिनी सतीश शिंदे या विद्यार्थिनी ८८.००% गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. त्याचप्रमाणे कु.रोहित दयानंद चोपडे ८६.४०% द्वितीय क्रमांक कु.तनुश्री उत्तम बामणे ८३.८०% तृतीय क्रमांक कु. तुषार रघुनाथ तांबे ७९.४० चतुर्थ क्रमांक %कु. समीक्षा आण्णा ढेरे ७७.८०% पंचम क्रमांक मिळवून यश संपादन केले. यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेकडून शाळेकडून व ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात आले.

# सुरेश कुटे यांना तात्काळ अटक करा-वर्षाताई जगदाळे

**वादळवार्ता/बीड**

मागील सहा महिन्यापासून ज्ञानराधा मल्टीस्टेट कॉपरेटिव अर्बन मल्टीस्टेट चे संचालक सुरेश कुटे यांनी बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील हजारो ठेवीदारांना फक्त ठेवी परत करण्याचे आश्वासन दिले. नेहमीच ठेवी परत करण्यास टाळाटाळ करणाऱ्या सुरेश कुटे यांच्यासह संचालक मंडळावर माजलगाव ,नेकनूर व बीड येथे फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अद्यापही पोलीस यंत्रणा सुरेश कुटे यांना अटक करू शकले नाही. निरव मोदी, विजय मल्ल्या यांच्या सारखे कुटे पळून जाण्याची वाट बीडची पोलीस यंत्रणा पाहत आहे का. तत्काळ सुरेश कुटे यांच्यासह सर्व संचालकांना अटक करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे. बीड जिल्ह्यातील हजारो ठेवीदारांना आर्थिक संकटात टाकून नाम निराळे झालेले सहा महिन्यापासून आश्वासन तारीख पे तारीख देणारे सुरेश कुटे यांच्या यांच्या विरोधात 420 कलम सह वित्तीय संस्था मधील हितसंबंध अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंद झाला आहे. नेकनूर, बीड ,माजलगाव सह इतर ठिकाणीही गुन्हा नोंद होण्याची प्रक्रिया सुरु असून सुरेश कुटे पोलीस यंत्रणेला चकवा देत इतर राज्यात जाऊ शकतात. वेळीच सुरेश कुटे यांच्यासह सर्व संचालक मंडळाला अटक करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे. बबन शिंदे सारखे सुरेश कुटे ही लापता होऊ शकतात पोलीस यंत्रणा मधील भ्रष्टाचार या अगोदर उघड झाला असून कर्तव्यनिष्ठ व चांगल्या अधिकाऱ्याकडे सुरेश कुटे यांचा तपास द्यावा सुरेश कुटे व अर्चना कुटे यांना अटक करावी अशी मागणी वर्षाताई जगदाळे यांनी केली असून अटक न झाल्यास जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



# ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस

तंबाखू,खैनी, गुटखा,खर्रा खाने "घातकच" परंतु खावुन थुंकणे "महाघातक".संपूर्ण जगातील लोकांना तंबाखू पासून मुक्ती मिळावी व आरोग्य सुद्दढ रहावे या उद्देशाने तंबाखू व धुम्रपान यापासून होणारा त्रास दुर करण्याकरीता तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो.जागतिक आरोग्य संघटना डब्लुएचओच्या सदस्य देशांनी तंबाखू सेवनाने होणाऱ्या बिमारीचा मृत्यू दरात वाढ झाल्यामुळे १९८७ ला महामारी घोषीत करण्यात आली व तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा सल्ला (सुझाव) देण्यात आला.८ एप्रिल १९८८ ला डब्लुएचओने वर्षगाठ साजरी केली व याच दिवशी ३१ मे तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो.डब्लुएचओने तंबाखू सेवनाने होणाऱ्या २५ प्रकारच्या शारीरिक बिमाऱ्या पहाता व ४० प्रकारचे कैंसर पहाता आणि या बिमारीचा वाढता मृत्यू दर पहाता याला महामारी घोषीत केली.डब्लुएचओच्या माहिती नुसार जगात तंबाखूने किंवा धुम्रपान केल्याने दरवर्षी ८० लाखांपेक्षा जास्त लोकांना आपले प्राण गमवावे लागतात.यावर जगातील देशांनी नियंत्रण ठेवले नाही तर मृत्यूचा आकडा दुप्पटीने वाढु शकतो. कोणत्याही नशेली पदार्थाचे अती सेवन करणे म्हणजे मृत्यूला कवटाळले होय.मानवाची जगण्याची दशा,दीशा ठरवीने हे मानवाच्या मनावर व हातामध्ये असते. परंतु आपल्या मनावरचा ताबा सोडून नशेली पदार्थाचे सेवन केले तर स्वत:ला व परीवाराला घातक सीध्द होवु शकते याला नाकारता येत नाही. तंबाखूच्या सेवनाने कॅन्सर सारखे महाभयानक आजाराने मानुस जखडतो आणि यांचा दुषपरीणाम संपूर्ण परीवाराला भोगावा लागतो.ह्याबाबी मानवाने स्वत: समजुन घ्यायला हव्यात.कोणत्याही नशेच्या बाबतीत सरकारचे दुटप्पी धोरण आपल्याला पहायला मिळते.सरकार नशेली वस्तुची खुलेआम विक्री करण्यास प्राधान्य देते व मोठ्या प्रमाणात परवाने सुध्दा देते आणि दुसरीकडे नशा न करण्याचे आव्हान करते याला कोणते धोरण म्हणावे? मध्यंतरी महाराष्ट्रत दारू-वाईन किराणा दुकान विक्रीला ठेवता येईल या चर्चेला मोठे उधाण आले होते.या चर्चेचा सर्वच स्तरातून निषेध करण्यात आला. त्यामुळे ताबडतोबच या चर्चेवर पुर्णविराम लागला. सरकारने नशाबंदीचे मोठ-मोठे सरकारी ऑफिसेस खोललेली आहेत. याकरीता देशभरात लाखो कर्मचारी कार्यरत असतात. याव्यतीरीक्त अनेक रजिस्टर्ड सामाजिक संस्था व्यसनमुक्तीसाठी कार्य करतांना दीसतात.परंतु सरकार स्वत:हुन नशेली पदार्थाचे उत्पादन बंद करायला तयार नाही. कारण नशेली(मद्द,तंबाखू,खैनी,सिगारेट,बिडी, गुटखा,गांजा इत्यादी) वस्तुपासुन राज्य व केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल (रेव्हेन्यू) मिळत असतो व त्यावर सरकारचा कारभार चालतो.यावरून स्पष्ट होते की सरकार पैसा कमविण्याकरीता दुटप्पी धोरण अवलंबुन मानवाचा जीव धोक्यात टाकत आहे. कोव्हीड-19च्या महामारीच्या काळात संपूर्ण भारतासह अनेक राज्यांमध्ये लॉकडाउन होता याकाळात दारूची दुकाने खोलण्याची मागणी सर्व प्रथम राजकीय पुढाऱ्यांची होती आणि अनेक राज्यांमध्ये लॉकडाउनच्या काळात दारूची दुकाने खोलण्यात आली.यामुळे सरकारच्या तिजोरीत करोडो रुपयांचा महसूल रूपात पैसा जमा झाला.यावरून स्पष्ट होते की पैशासाठी सरकार लोकांना व्यसनाधीन करीत आहे. लॉकडाउनच्या काळात दारू, सिगारेट, बीडी,तंबाखू, खैनी, गुटखा,खर्रा,गांजा याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा होता ह्या वस्तु अवैधरीत्या दुप्पटीने किंवा तिपटीने लोकांनी घेतल्या परंतु नशासोडण्याला कोणीही महत्त्व दिले नाही. लॉकडाउनच्या काळात लोकांना नशा सोडण्याची सुवर्णसंधी होती.परंतु नशेली वस्तुंची दुकाने खुलताक्षणी सोशल डिस्टिंक्शनची धज्जीया उडवून नशेली वस्तु घेण्याकरिता 3 कीलो मिटर पर्यंत लोक रांगेत उभे होते.अशाने कोणत्याही नशेवर आळा बसणार नाही.प्रत्येकानी जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणीही नशेच्या आहारी जावु शकत नाही.कोणतीही नशा असो ती घातकच असते. परंतु अती नशा मृत्यूच्या खाईत नेल्या शिवाय रहाणार नाही.याला म्हणतात"अती तिथे माती". त्यामुळे कोणतीही नशा करतांना सावधगिरी बाळगली पाहिजे.अन्यथा जिवीत हानी अटळ आहे. तंबाखू, गुटखा,खैनी,खर्रा, सुपारी, दारू यापासून शरीराच्या कोणत्याही अवयवांच्या विकासासाठी चालना देत नाही मग या वस्तूचे सेवन का करावे? कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला "छल्ली" व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणत: नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात.उदाहरण द्यायचे झाले तर बादाम १००० रूपये किलो यांच्या तुलनेत गुटखा ४४०० रूपये किलो, शुद्ध तुप ६०० रूपये किलो यांच्या तुलनेत तंबाखू १७०० रूपये किलो, सफरचंद१०० रूपये किलो यांच्या तुलनेत सुपारी ६०० रूपये किलो,दुध ५० रूपये लिटर यांच्या तुलनेत दारू ६०० रूपये लिटर अशा प्रकारे अशा अनेक पोष्टीक वस्तू आहेत की त्यांची किंमत नषेली वस्तू पेक्षा कितीतरी पटीने स्वस्त व कमी आहेत.परंतु नशा करणारे बहाद्दर नशेला जास्त महत्त्व देतात हे त्यांचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.कोव्हीड-19च्या महामारी पासून सरकारने रस्त्यावर थुंकण्यावर बंदी घातली होती त्याचप्रमाणे सरकारने तंबाखू,गुटखा,खैनी, खर्रा,गांजा यावर सुध्दा बंदी घालायला पाहिजे होती.यामुळे मृत्यू दर कमी होण्यास मोठी मदत होईल. करोना काळात कोरोना महामारीचा प्रकोप दीवसेंदीवस वाढत असतानाच केंद्रशासित प्रदेशासह २८ राज्यांनी तंबाखू व धुम्रपानामुळे कोरोणाची लागन होण्याची शक्यता पहाता. त्यातच फुफ्फुसाचा कर्करोग होतो किंवा रोगप्रतिकारक शक्ती कमी होते असे आरोग्य तज्ञांचे म्हटले होते. या पार्श्र्वभूमीवर तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा सेवन आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घालने उचीत होते तीच पद्धत नेहमीसाठी सरकार कडून अमलात यायला हवी.सध्याच्या परीस्थितीत युवापिढी "धुम्रपानाच्या"आहारी जातांना दिसत आहे.त्यांनी मनावर ताबा ठेवुन धुम्रपानाचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन धुम्रपानाचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे "मृत्यूच्या रांगेत"उभे रहाल्यासारखे आहे.याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे.सरकारने कीतीही नशेली वस्तु विकण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कोणीही रस्त्यावर तंबाखू,खर्रा किंवा इतर नशेली वस्तू थुंकु नये याची काळजी घ्यायला हवी. कारण रस्त्यावर थुंकल्याने अनेक बिमाऱ्यां व संक्रमनात मोठ्या प्रमाणात वाढ होवून आरोग्य धोक्यात येऊ शकते.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुद्दढ रहालो तर आपली पिढी सुद्दढ राहील" त्याचप्रमाणे "आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.त्यामुळे तंबाखू खर्रा खावुन रस्त्यावर थुंकु नका व कोणत्याही महामारीला जाहीर आमंत्रण देवु नका ही माझी आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे. याकरीता तंबाखू निषेध दिनाच्या निमित्ताने आपण"संकल्प"करूया की यानंतर धुम्रपान व इतर नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करू या.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजि विद्यापिठ प्रतिनिधी नागपूर) .
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## कु.साक्षी बाळासाहेब राऊत 94.20 गुण घेवून मिळविले घवघवीत यश

संत रविदास प्रतिष्ठानचे बीड जिल्हाध्यक्ष सोमनाथ (बाळासाहेब) राऊत यांची कन्या कु. साक्षी सोमनाथ (बाळासाहेब) राऊत हिने इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेत ९४.२० टक्के गुण घेवून घवघवीत यश मिळविल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी बोर्डच्या शालांत परीक्षेत संस्कार विद्यालयाची विद्यार्थीनी कु. साक्षी सामेनाथ (बाळासाहेब) राऊत हिने नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात ९४.२० टक्के गुण संपादीत करुन यश मिळविल्याबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन केले जात आहे. तसेच या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षिका वृंद या सर्वांचे योग्य मार्गदर्शनामुळे साक्षीच्या यश संपादनासाठी मोलाचे सहकार्य लाभले आहे. तिच्या यशाबद्दल आजोबा बबन राऊत, आजी कुसूम डोईफोडे,आई अर्चना राऊत, वडिल सोमनाथ (बाळासाहेब) राऊत,शाम गायकवाड,गणेश शेवाळे,पांडूरंग रामगुडे, विष्णू गायकवाड, पुष्पा वाघमारे आदींनी कौतुक करुन अभिनंद केले.




## महावितरण अधिका-्यांनी लाजा सोडल्या? शेतकरी फड यांची ऊर्जा मंत्र्याकडे तक्रार बीड जिल्ह्यातील लाचखोरीच्या आठ घटना ताज्या असताना!

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

महावितरण कडून शेतकऱ्याची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे . अंबाजोगाई तालुक्यातील पूस येथे गट नंबर ४८३ मध्ये शेतकरी श्रीकर त्र्यंबकराव फड (रा. नांदेड) जमीन असून या गटात पेट्रोल पंपाचे काम सुरू आहे. याच गटातुन ३३ केव्ही लाई रस्त्यालगत शिफ्ट करण्यासाठी फड यांनी ४ लाख रुपये महावितरण कडे भरले. शिष्टींग मंजुरी मध्ये केबल टाकायचे मंजुर असताना कनिष्ट अभियंता सतिश गुडे व वरीष्ट अभियंता कानडे यांनी २लाख रुपयांची लाचेची मागणी केली असल्याचा आरोप शेतकरी फड यांनी केली आहे. तशी तक्रार देखील ऊर्जा मंत्री यांच्याकडे करण्यात आलेली आहे. बीड जिल्ह्यात लाचखोरीच्या घटना घडत असून एका आठवड्यात ८ कारवाया झालेल्या घटना ताज्या असताना देखील महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्याना लाचेची मागणी करण्यात आली आहे अंबाजोगाई तालुक्यातील पुस येथील अकरा शेतकर्यांनी गिरवलीच्या २२० केव्ही केंद्रातुन घाटनांदुर ३३ केव्ही केंद्राला जाणारी लाईनला पन्नास वर्षे पुर्ण झाले असुन ते कुमकुवत झाले आहेत. त्यामुळे ते केंव्हाही पडुन मोठा अपघात होईल अशा आशयाची तक्रार १५ डिसेंबर २३ रोजी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्याकडे केली होती. पण कारवाई काहीच झाली नाही. झालेल्या चक्री वादळात ही लाईन जमीन दोस्त झाल्याने मोठा अनर्थ टळला आहे श्रीकर त्र्यंबकराव फड (रा रामनगर नांदेड) यांच्या पुस येथे ४८३ गटा मध्यें जमीन असुन या गटात पेट्रोल पंपाचे काम सुरू असून गटातुन ३३ केव्ही लाईन रस्त्यालगत शिफ्ट करण्यासाठी ४ लाख रुपये महावितरण कडे भरले. शिष्टींग मंजुरी मध्ये केबल टाकायचे मंजुर असताना कनिष्ट अभियंता सतिश गुडे व वरीष्ट अभियंता कानडे यांनी २ लाख ची लाचेची मागणी केली परंतु फड यांनी ती पुर्ण न केल्यामुळे कंत्राटदाराचा लाभ होईल याउद्देशाने दोन्ही अभियंत्यानी केबल ऐवजी तार ओढली. याची तक्रार सहव्यवस्थापकीय संचालक छत्रपती संभाजी नगर, मुख्य अभियंता लातुर, अधिक्षक अभियंता बीड व उर्जा मंत्री यांच्याकडे केली होती. त्यानंतर दोन्ही अभियंत्यांची चौकशी समिती नेमली. या समितीने दोन्ही अभियंत्यानी पदाचा गैरवापर करुन गुत्तेदाराचा फायदा होईल असे कृत्य केल्याचे दिसुन आल्याचा अहवाल दिला. यात तक्रारदाराच्या तक्रीत तथ्य आढळुन आल्याणे राहुल गुप्ता यांनी २३ एप्रील रोजी दिलेल्या गोपनीय अहवालात कनिष्ट अभियंता सतिश गुडे वरीष्ट अभियंता कानडे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन विभागीय चौकशीअंती अंतिम शिक्षा प्रस्तावीत करण्याकरिता कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी असा आदेश महिनाभरापुर्वी दिला असतानाही संबधितांवर कार्यवाही झाली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे लाचेची मागणी पुर्ण न केल्यानेच माझी फसवणुक माझ्या व्यवसायिक जागेतील ३३ केव्ही लाईन शिफ्ट करण्यासाठी महावितरणच्या नियमाप्रमाणे चार लाख रुपये भरले आहेत. महावितरणकडुन दिलेल्या कोटेशन प्रमाणे पुर्तता केली आहे. मंजुरी केबल ची असताना तारा ओढल्या आहेत. व सुपरव्हिजन महावितरण ने करायचे असते ते जाणीवपूर्वक चुकीचे केले आहे. कालच्या चक्रीवादळात बेकायदेशीर असलेले तार पोल माझ्या जागेत वाकलेले आहेत. खरे तर तेथे नियमाप्रमाणे असायला पाहिजे. माझ्या व्यवसायिक जागेत पेट्रोल पंपावर काम करणार्या मजुर जीवाशी गेले असते. याला कोण जवाबदार राहणार. महावितरण कडून सुपर विजन व्यवस्थित झाले नाही. म्हणुन माझी फसवणुक झाली आहे. असे श्रीकर त्र्यंबकराव फड, व्यवसायिक व शेतकरी, पुस यांनी तक्रार निवेदनात म्हटले आहे.

## जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरे शाळेचा निकाल १००%

**उरण प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शाळांत परीक्षेचा निकाल सोमवार दि २७ मे २०२४ रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत उरण येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल ने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १००%



लागला असून कुमारी श्रुती रत्नाकर म्हात्रे या विद्यार्थिनी ने ९०.६०% गुण संपादन करून शाळेमध्ये सर्व प्रथम क्रमांकाने उतीर्ण होण्याचा मान मिळवलेला आहे. तसेच या शाळे मध्ये द्वितीय क्रमांक ने कुमार वेदांत, रवींद्र गावंड ह्याने ८७.६०% आणि कुमारी आर्या उत्तम गावंड हिने ८४.४०% तर कुमारी प्रियांशी पंकज म्हात्रे हिने ८४.४०% मिळवून तृतीय क्रमांक संपादन केले आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अशोक ठाकूर, खजिनदार वामन ठाकूर, सेक्रेटरी अलका ठाकुर, विश्वस्त सिंधू ठाकूर व प्रसाद ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे व शिक्षक पालक संघाचा उपाध्यक्षा शुभांगी पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

## दहावीच्या परीक्षेत कु. उत्कर्षा जाधवचे नेत्रदीपक यश ; ९९.८०% गुणांना गवसणी

**बीड प्रतिनिधी**

येथील श्री. शिवाजी विद्यालयाची विद्यार्थिनी कु. उत्कर्षा जाधवने दहावी बोर्ड परीक्षेत ९९.८०% गुण घेऊन नेत्रदीपक यश संपादन केले आहे. उत्कर्षाच्या या यशाबद्दल तिचे कौतुक होत आहे.



बीड येथील श्री. शिवाजी विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या उत्कर्षा जाधवने ५०० पैकी ४९९ गुण संपादन करून (९९.८०% ) अक्षरशः गगनाला गवसणी घातली आहे. दरम्यान, इयत्ता दहावीच्या निकालापूर्वीच लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात झालेल्या स्क्रीनिंग परीक्षेत उत्कर्षाची AIIMS (मेडिकल) बॅचसाठी निवड झाली आहे. आपल्या नेत्रदीपक अशा यशाचे गुरुजन आणि वडील डॉ. ज्ञानेश्वर जाधव, आई सुनंदा जाधव यांना श्रेय दिले आहे. गुणवंत उत्कर्षाचे धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांनी पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

# गिरजा मध्यम प्रकल्प येसगाव ते खुलताबाद नवीन पाईपलाईन कामे अंदाजपत्रकानुसार करण्याची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**गंगापूर/प्रा संजय तुपे**

खुलताबाद शहराला गिरिजा मध्यम प्रकल्पातुन येणारी पाईपलाईन हि ४५ वर्षे जुनी झाली असुन त्या जुन्या पाईपलाईनच्या जागी नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू झाले असुन हे काम अंदाजपत्रकानुसार करावे अशी मागणी निवेदन माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक अॅड कैसरोद्दीन यांच्या नेतृत्वाखाली मुख्याधिकारी विक्रम दराडे यांना लेखी तक्रारीचे निवेदन देण्यात आले. खुलताबाद शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन हि ४५ वर्ष जुन्या पाईपलाईनच्या जागी नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू झाले असुन हे काम अंदाजपत्रकानुसार कामें करावी तसेच शहरातील पाणीपुरवठा पाईपलाईन हि प्लास्टीक पाईपलाईन टाकु नये त्या जागी जी. आय. लोखंडी पाईपलाईन हि ६



ते ८ इंची टाकण्यात यावे . भविष्यात खुलताबाद शहरातील पाण्याची नागरिकांची समस्या कायमस्वरूपी तोडगा निघाला पाहिजे यांची दक्षता द्यावी. शहरातील पाणीपुरवठा पाईपलाईन हि जी. आय. पाईप टाकले नाही तर या कामा विरोध्दात आंदोलन करण्याचा इशारा माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक अॅड कैसरोद्दीन, मुनीबोद्दीन, शरफोद्दीन रमजानी, शब्बीर अहमद, शफीयोद्दीन इंजिनियर, फकीर कुरैशी, शेख रियाज, तालेब कुरेशी, नवाब कमरोद्दीन आदीनी दिला आहे. **माजी नगराध्यक्षा सुषमा भावसार यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन पाईपलाईन टाकण्याच्या मागणीसाठी ९ कोटी होती पण तांत्रिक कारणास्तव हि योजना प्रलंबित पडली. नंतर हिच योजना माजी नगराध्यक्ष अँड एस एम कमर अॅड कैसरोद्दीन, नगरसेवक मुनीबोद्दीन, उपनराध्यक्ष सुरेश मरकड, जुबेर लाला, रूखमनबाई फुलारे, परसराम बारगळ, योगेश बारगळ, लक्ष्मीबाई लाळे, यांनी पुन्हा परिश्रम घेऊन पुन्हा हि योजना कॅबिनेट मंत्री अब्दुल सत्तार यांच्या विशेष शिफारसपत्राने मंत्री अभिजीत देशमुख, आ. प्रशांत बंब, आ. सतीश चव्हाण यांच्या सहकार्याने १८ कोटी वरुन २१ कोटी २२ लाख रूपये हि योजना मंजूर करून घेतली.**

## तुलसी इंग्लिश स्कुलची 100% टक्के निकालाची परंपरा कायम
## गुणवंत विद्यार्थ्यांचे डॉ.प्रियंका रोडे, प्राचार्या उमा जगतकर यांनी केले अभिनंदन

**बीड प्रतिनीधी**

बीड येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचलित तुलसी इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल १००% लागला असून गुणवंत विद्यार्थ्यांचे डॉ.प्रियंका रोडे, प्राचार्या उमा जगतकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथे शैक्षणिक वर्ष




२०२३-२४ मध्ये दहावी परीक्षेमध्ये क्षितिज धनवे ९४.००% घेऊन प्रथम आला आहे. द्वितीय क्रमांक आर्या चव्हाण ९३.८०% तर आर्यन कोरडे ९२.००% घेऊन तृतीय आला आहे. हर्मिका जगतकर ९१.८०%, दीक्षा सरपते ९१.८०%, सार्थक पोकळे ९१.८०%, शेख झोया ९१.४०%, निशा मस्के ८९.६०%, कृष्णा दबडे, ८९.४०%, जिया लोखंडे ८८.६०% घेऊन चांगल्या मार्कने उत्तीर्ण झाले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे, प्राचार्या उमा जगतकर, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सोयगाव तालुक्याची पावसाची वार्षिक सरासरीत ४४ मीमीची वाढ यंदा एक जून पासून पावसाची गणना करणार


**वादळवार्ता/सोयगाव**

डोंगर रांगांनी वेढलेल्या सोयगाव तालुक्याची पावसाच्या वार्षिक सरासरी मध्ये मागील वर्षीच्या तुलनेत ४४ मी मी ने वाढ करण्यात आली आहे यंदा पावसाची वार्षिक सरासरी ८०० मी मी ग्राह्य धरण्यात आली असल्याचे तहसीलदार मनीषा मेने यांनी सांगितले आहे त्यामुळे मागील वर्षी असलेल्या ७५६ मी मी वार्षिक सरासरी च्या तुलनेत यंदा ४४ मी मी ची वाढ झाली आहे आगामी खरिपाच्या हंगाम सह पावसाळ्यासाठी तालुका प्रशासन सज्ज झाले आहे मंडलस्तरावर सोयगाव तालुक्यात पावसाची मोजनी करण्यासाठी चार पर्जन्यमापन केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहे तसेच हवामान वर आधारित दोन पर्जन्यमान केंद्रे सज्ज झाली आहे आपत्ती निवारण साठी सोयगाव तहसील कार्यालयात (दि.०१) जून पासून कक्ष स्थापन करण्यात येणार आहे तसेच यंदाच्या पावसाळ्यात (दि.०१) पासून पावसाची सरासरी मोजणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे त्यामुळे सात जून ऐवजी आता एक जून पासून शासन दरबारी पावसाची नोंद राहणार आहे दरम्यान दर दहा वर्षांनी वाढणारी पावसाची वार्षिक सरासरी दोन वर्षांत दोनदा वाढली आहे मागील वर्षी सोयगाव ची वार्षिक सरासरी ७५६ मी मी इतकी होती मागील वर्षी सोयगाव तालुक्यात वार्षिक सरासरी च्या जास्त पाऊस १२८९ मी मी पावसाची नोंद झाली आहे त्यामुळे यंदाही सोयगाव तालुक्यात चांगला पाऊस होण्याचे भाकीत तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे..

# जिल्हा परिषदेतील कर्मचारी निलंबित पाच कर्मचा-यावर कारवाईचे आदेश, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांची कारवाई

**दैनिक वादळ वार्ता नाशिक/सुरेश इंगळे**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आठ कर्मचाऱ्यावर कारवाईचे आदेश दिले आहेत. कारवाई करण्यात आलेल्या मध्ये ग्रामपंचायत विभागातील दोन, बांधकाम विभागातील दोन, शिक्षण विभागातील तीन तर आरोग्य विभागातील एका कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. त्यातील तीन कर्मचाऱ्यांचे थेट निलंबन करण्यात आले असून यामुळे नाशिक जिल्हा परिषद मध्ये मोठी खडबड उडाली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की चांदवड तालुक्यातील वडनेर भैरव प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या कामकाजाविषयी वारंवार तक्रारी येत होत्या , त्यांच्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे पथक पाठविले असता वैद्यकीय अधिकारी हे तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना न कळवता गैरहजर असल्याचे आढळून आले .त्यामुळे कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया झालेले रुग्ण असताना त्याची वैद्यकीय तपासणी झालेली नव्हती . त्यामुळे या संदर्भात चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करण्यात आला आहे. तसेच दिंडोरी तालुक्यातील सहविचार सभेत दोन शिक्षकांमध्ये वाद निर्माण होऊन हाणामारी करतानाची चित्रफीत समाज माध्यमावर व्हायरल झाली होती. यात एका शिक्षकाचे निलंबन करण्यात आले आहे. तर इगतपुरी तालुक्यातील वाडीवरे गावातील जिल्हा परिषद शाळेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची भेट दिली होती, त्यावेळी शाळेत कुणीही हजर नव्हते. त्यामुळे मुख्याध्यापकावर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच ग्रामपंचायत विभागातील प्रतिनियुक्ती असलेले




ग्रामसेवक बाबतीत तक्रार करण्यात आली होती. त्या अनुषंगाने ग्रामसेवकाला कार्यमुक्त करण्याचे आदेश देण्यात आले. तर दुसऱ्या एका प्रकरणात मालेगाव तालुक्यातील वळवाडी येथे कार्यरत असणाऱ्या ग्रामसेवकांनी नागझरी आणि हाताने ग्रामपंचायतीचे दप्तर तपासणीसाठी दिले नाही, तसेच निमशेवाडी येथील लेखा परीक्षण येथे नसल्याने निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. आणि सुरगाणा पंचायत समिती येथील बांधकाम विभागाचे उपअभियंता यांना 40000 रुपयाची लास घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याने निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच बागलाण पंचायत समिती येथील उप अभियंता यांच्या कामकाजाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली होती, या संदर्भात संबंधित उपअभियंता कारणे दाखवा नोटीस बजाण्यात आली असून एकूण तीन जणांच्या निलंबनासह आठ जनावर नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही कारवाई केली आहे.

## बँक ऑफ बडोदाकडून होर्णाया गैरसोयी आणि त्रासाला कंटाळुन ग्राहकांची जिल्हाधिकार्यां कडे लेखी तक्रार जिल्हाधिकार्यांनी लक्ष घालण्याची निवेदनाआधारे केली मागणी

**प्रतिनिधि/बीड**

-शहरातील सुभाष रोड येथील बँक ऑफ बडोदा येथे ग्राहकांना ये-जा करण्यासाठी तसेच दारात वाहन उभे करण्यासाठी, बँकेत गेल्यावर बसण्यासाठी आसन व्यवस्थान नसल्याने तसेच बँकेत आलेल्या ग्राहकाला हवा घेण्यासाठी देखील कोणतीच व्यवस्था नसल्याने तसेच बँक व्यवस्थापनाकडून देखील कोणतीच व्यवस्था न झाल्याने बँकेचे ग्राहक मनोज देशमुख, सुदर्शन शिंदे, सुनिल बुंदेले, प्रविण कुलथे, लखन करंडे यांनी जिल्हाधिकारी बीड यांची भेट घेवून या संदर्भात लेखी तक्रार केली आहे. पुढे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, बँक शाखेच्या इमारतीची अवस्था ही अत्यंत दुर्धर व बीड नागरिकांस गैरसोईची आहे. प्रथमतः शाखेमध्ये प्रवेश करण्यासाठी तयार करण्यात आलेला उतार हा खूप लहान व अडचनीची आहे. त्यावरून वृद्ध व्यक्तीला आणि इतर कोणत्याही व्यक्तीला देखील जाण्यापुरती जागा आहे व हा उतार समोरील नाली शेजारी असल्याने वृद्ध ग्राहकांची खूप गैरसोय होत आहे या ठिकाणी अनेक वृद्ध व्यक्ती ये- जा करत असतांना जमिनीवर पडलेले आहेत. या शाखेमध्ये व्यवहारासाठी जायचे असल्यास कोठेही पार्किंग व्यवस्था नाही. जर दुसरीकडे वाहन पार्क केले तर शेजारील दुकान मालक मनाई करतात व त्यामुले वाहतुकीची नेहमी कोंडी होते या शाखेला कोठेही हवा येण्यासाठी जागा नाही व ज्याने आतमध्ये प्रवेश केल्यानंतर श्वसनाचा त्रास होतो. आत बसण्यासाठी योग्य ती व्यवस्था आहे, परंतु तिथे होणाऱ्या गुदमरण्याचा त्रास हा कोणत्याही सामान्य माणसाला आणि विशेषतः वयोवृद्ध लोकांना असह्य होतो. तसेच पावसाच्या वातावरणामधे वरील छतामधून पाणी टपकते. ग्राहकांची लॉकर फॅसिलिटी सुद्धा शाखेमध्ये आहे परंतु शाखेची इमारत ही मजबूत नाही हे सर्वेक्षण केल्यावर देखील सांगता येईल.या संदर्भात संबंधित व्यवस्थापकास वारंवार तोंडी व लेखी सुचना करूनही कसल्या प्रकारची दखल घेतली जात नाही. तेव्हा जिल्हाधिकारी साहेब आपणच आपल्या स्थरावरूनच संबधित बँक प्रशासनास आदेशीत करावे की, सध्याची जागा ही शाखेसाठीही योग्य नाही व ग्राहकांसाठीही सोयी बँक व्यवस्थापनाकडून देण्यात याव्यात यासाठी सूचना कराव्यात अशी मागणी पत्रकाआधारे केली आहे.

## लता सुभेदार यांचे निधन



हलकर्णी (ता. चंदगड) येथील लता शिवाजी सुभेदार (वय ५५ )यांचे निधन झाले. त्यांच्या मागे पती, एक मुलगा, दोन मुली सुन - नातवंडे असा परिवार आहे. आसगाव(ता. चंदगड )येथील प्रगतशील शेतकरी शिवाजीराव पाटील आणि अमेरिका स्थित सॉफ्टवेअर इंजिनियर अरुण पाटील आणि यांच्या त्या जेष्ठ भगिनी होत. उत्तरकार्य शुक्रवार ता.७ जून रोजी हलकर्णी येथे आहे.

# महाराष्ट्रात किती जागा कुणाच्या पारड्यात?
# अजित पवारांविषयीच्या दाव्याने एकच खळबळ

**मुंबई /प्रतिनिधि**

राज्यातील लोकसभेच्या 48 जागांसाठी मतदान संपले आहे. पाच टप्प्यात मतदान झाले. महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही पण या निवडणुकीत मोठ्या फरकाने बहुमत येण्याचा दावा करत आहेत. 4 जून रोजी लोकसभा निवडणूक 2024 चा निकाल लागणार आहे. मग राज्यात कुणाच्या बाजूने कौल लागणार याची जनतेसह राजकीय पक्ष, नेते, राजकीय विश्लेषकांना मोठी उत्सुकता लागली आहे. याविषयी आता काही ज्योतिषांनी भाकित केले आहे. अजित पवार



गटाला किती जागा? अनिल थत्ते यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत, अजित पवार गटाला किती जागा मिळतील याविषयीचा दावा केला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. अजित पवार गटाचा एकही उमेदवार निवडून येणार नाही. त्यांचा एक पण खासदार नसेल, असा दावा थत्ते यांनी केला आहे. अर्थात हा केवळ अंदाज आहे. निकालानंतर चित्र स्पष्ट होईल.शरद पवार गटाबाबत हा दावा

थत्ते यांनी अजित पवार गट एकही जागा जिंकणार नसल्याचे भाकित केले आहे. तर शरद पवार हा अजित पवार गटापेक्षा जोरदार कामगिरी करणार असल्याची भविष्यवाणी केली आहे. तर उद्धव ठाकरे गटाला या निवडणुकीत सहानभुतीचा फायदा होणार असल्याचे सांगितले आहे. या दोन्ही गटाला किती जागा मिळतील याविषयीचे आकडे समोर आलेले नाहीत

## कुणाच्या पारड्यात सत्ता?

ज्योतिषी अनिल थत्ते यांनी लोकसभा निवडणुकीत कुणाच्या पारड्यात किती जागा असतील याचे भाकित केले. त्यांनी महाविकास आघाडी आणि महायुतीला या लोकसभेच्या रणसंग्रामात किती जागा मिळतील याविषयी भाकित केले. त्यांनी महाविकास आघाडीपेक्षा महायुती अधिक जागा मिळण्याचा अंदाज वर्तविला आहे. 37 ते 40 जागेवर महायुती जिंकण्याचा कौल त्यांनी दिला आहे

## कु. किरण राजाभाऊ केदार हिचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**वादळवार्ता/केज**

कै. राम चौरे प्राथ. माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु.किरण राजाभाऊ केदार हिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करताना ९३.०० % गुण मिळवले आहेत. तिच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. कु.किरण राजाभाऊ केदार ही केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील शेतकरी राजाभाऊ केदार यांची कन्या आहे.



तिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत ९३.०० % टक्के मिळवले आहेत. तिच्या या यशासाठी मुख्याध्यापक अशोक मस्के, रामेश्वर घुले सर, सिद्धार्थ शिनगारे सर , नामदेव मुंडे सर, आचार्य मॅडम डि.एस .चौरे सर यांनी विशेष परिश्रम घेतले आहे. तिने अथक परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यास करून हे यश मिळवले आहे. कु.आकांक्षा हिने इंग्रजी या विषयात ९२, मराठी ९३, हिंदी ९४, गणित ९३, सायन्स अँड टेक्नलॉजी ९४ आणि सोशल सायन्स ९४ असे गुण मिळवत एकूण ५०० पैकी ४६८ गुण मिळवले आहेत. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष खंडेराव चौरे, वर्गशिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

## परचुंडी तालुका परळी वैजनाथचा युवा क्रिकेटपटू भूषण नावंदे एमपीएल मध्ये चमकणार कोल्हापूर टस्कर संघामध्ये निवड

**वादळवार्ता/परळी**

शहरातील उदयोन्मुख युवा क्रिकेटपटू भूषण नावंदे यंदाच्या महाराष्ट्र प्रिमियम लिगमध्ये (एमपीएल) चमकणार आहे. कोल्हापूर टस्कर संघात भारताचा धडाकेबाज क्रिकेटपटू केदार जाधव यांच्या नेतृत्वाखाली भूषण खेळणार आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे 'आयपीएल'च्या धर्तीवर महाराष्ट्र प्रिमियम लीगचे गेल्या काही वर्षांपासून



आयोजन केले जात आहे. यंदा दोन जूनपासून सुरू होणाऱ्या 'एमपीएल'मध्ये सहा संघ सहभागी झाले आहेत. त्यात छत्रपती संभाजी किंग्ज, ईगल नाशिक टायटन्स, कोल्हापूर टस्कर, पुणेरी बाप्पा, रत्नागिरी जेट्स, सोलापूर रॉयल्स संघांचा समावेश आहे. परचुंडी तालुका परळी वैजनाथ येथील भूषण नावंदे याची पुनीत बालन प्रायोजक असलेल्या कोल्हापूर टस्कर या संघामध्ये निवड झाली आहे. केदार जाधव यांच्या नेतृत्वाखालील संघात अंकित बावणे यांच्यासह अनेक दिग्गज खेळाडू आहेत. त्यात भूषण याची वर्णी लागली आहे. भूषण याने यापूर्वी अनेक स्पर्धा गाजविल्या आहेत. सय्यद मुश्ताक अली सराव शिबिरात त्याची निवड झाली होती. भूषण लंडन येथे क्लब काऊंटी स्पर्धेमध्ये अनेक वेळा क्रिकेट खेळला आहे. त्याने तो ज्येष्ठ फोटोग्राफर भीमाशंकर नावंदे यांचा मुलगा आहे.

# परळी नगर परिषदेच्या वतीने मान्सूनपूर्व स्वच्छतेच्या कामांना वेग मोठ्या नाल्यांची साफसफाई सुरू

**परळी प्रतिनिधी**

नगर परिषदच्या वतीने शहरातील मोठ्या नदी व नाल्यांच्या सफाईचे काम सुरू करण्यात आले आहे. मान्सून तोंडावर आला असताना नगरपालिका क्षेत्रातील लहान-मोठ्या नाल्यांची सफाईच्या कामे वेगाने सुरु आहेत. यासाठी जे.से.बी., ट्रॅक्टर आदी मशनरीसह स्वतंत्र मजुरांची नियुक्ती करुन साफसफई करण्यात येत असल्याची माहिती देऊन यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी केले आहे.

शहरातील नाल्यामध्ये कचऱ्यामुळे पाणी साचु नये आणि नाल्या तुंबून रस्त्यावर पाणी येऊ नये यासाठी परळी पालिकेच्या स्वच्छता विभागाकडुन मान्सुन पुर्व स्वच्छता कामांना गती देण्यात आली आहे. नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, उपमुख्याधिकारी संतोष रोडे व स्वच्छता निरीक्षक शंकर साळवे, विशाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विभागातील विश्वेश्वर डुबे, विलास केदारी, सुरेश वाल्मिकी, राजाभाऊ जगतकर, राजाभाऊ गायकवाड, जेसीबी चालक सिद्धार्थ कसबे, धनराज कसबे व सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने पावसाळ्यापूर्व कामे हाती घेण्यात आली आहेत. पावसाळ्यात शहरातील मोठे नाले आणि नाल्या तुंबून रस्त्यावर पाणी येणार नाही. नागरीकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

परळी शहरातील सरस्वती नदी गोपाळ टॉकीज ते सार्वजनिक समशान भूमी, उखळवेस ते सिमेंट फेक्ट्ररी, मलिकपुरा, पंचायत समिती ते नाथ रोड, आझाद नगर (वीटभटी पूल) ते रेल्वे लाईन पुल तसेच विविध भागातील नाल्या यासह शहरातील विविध छोट्या मोठ्या नाल्यांमधील गाळ व कचरा काढण्यात येत आहे. यासाठी दोन जेसीबी, पाच ट्रॅक्टरद्वारे व कर्मचाऱ्यांच्यासह्याने साफसफई करण्यात येत आहे. पावसाळा सुरु होई पर्यन्त ही साफसफाई करण्यात येणार असुन या काळात शहरातील ज्या नाल्या तुंबल्या आहेत. त्यातील गाळ



काढण्यात येणार असुन नागरिकांनी आपला कचरा घंटागाडी मध्ये टाकावा असे आवाहन स्वच्छता विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच हे सर्व कामे अंतिम टप्प्यात आले असल्याची माहिती दिली आहे.

शहरात कोणतेही काम करण्यासाठी नागरीकांचा पुढाकार आवश्यक असतो. पावसाळ्यात व्यापारी, नागरीकांना त्रास होऊ नये, शहरातील कोणतीही नाली तुंबू नये यासाठी पालिकेने साफसफईची कामे हाती घेतली आहेत. ही कामे युध्द पातळीवर करण्यात येत आहेत मात्र नागरीकांनीही कचरा नालीत टाकून पाणी वाहून जाण्यास अडथळा होईल असे करू नये, कर्मचारी करीत असलेल्या कामांना सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी केले आहे.

## कोप्रोली चौकात सॅन्डविचच्या दुकानाला आग आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश. सुदैवाने कोणतेही जीवितहानी नाही.

उरण तालुक्यातील कोप्रोली येथे कोप्रोली चौकात असलेल्या गुप्ता सॅन्डविचच्या दुकानाला मंगळवार दि २८ मे २०२४ रोजी दुपारी २ च्या सुमारास अचानक आग लागली. दुकानातून मोठया प्रमाणात धूर बाहेर पडू लागले.अचानक आग लागली व ज्वाला भडकू लागल्या. आगीवर नियंत्रण मिळविणे कठीण झाल्याने शेवटी उपस्थित सामाजिक कार्यकर्ते सुदेश पाटील यांनी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना फोन करून संबंधित घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे कर्मचारी अधिकारी घटना स्थळी दाखल झाले व त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले. सदर घटना शॉर्ट सर्किट मुळे झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेत एका सिलेंडरचा स्फ़ोट देखील झाला आहे. सदर दुकानात असलेली इलेक्ट्रिक उपकरणे, विविध सामान, वस्तू, अन्न पदार्थ, मशीन, फ्रीज, फॅन, बसण्याचे खुर्च्या टेबल आदी वस्तूंचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. किमान अडीच लाखाहून जास्त किंमतीचा मालाचे , वस्तूचे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतेही जीवितहानी झाली नाही. फायर ब्रिगेडच्या कर्मचाऱ्यांनी आगीवर नियंत्रण मिळविल्याने नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला.



आम्ही नेहमी मोऱ्यावरून कोप्रोली येथे धंद्यासाठी येत असतो. दुकान भाड्याने घेतले आहे. सॅन्डविच, आईस्क्रीम, ज्यूस तसेच इतर पदार्थ बनवून विकत असतो. दुकानात वायरच्या शॉर्ट सर्किट मुळे आग लागली आहे. आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला पण आग विझली नाही. शेवटी अग्निशमन दलाला बोलवावे लागले. या दुर्घटनेत एक सिलेंडर तसेच विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे व विविध वस्तू, खुर्च्या टेबल, मशीन, फ्रीज आदी वस्तू जळून खाक झाले. अंदाजे अडीच लाख हुन जास्त किंमतीचे नुकसान झाले आहे. आमची परिस्थिती गरिबीची असून आमच्यावर खूप मोठे संकट कोसळले आहे. आम्ही आता बुडालो. आम्ही बरबाद झालो.आम्हाला आता काहीच सुचत नाही

# आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार ज. वि. पवार यांच्या कर्तृत्वावर जागतिक मोहर ! उत्तर अमेरिकेतील आंबेडकराईट असोसिएशनचाफविशेष पुरस्कार प्रदान !

**(चिपळूण प्रतिनिधी)**

दलित पॅंथरचे सहसंस्थापक आणि आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार, जेष्ठ साहित्यिक ज. वि. पवार यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक कर्तृत्वावर दिनांक 25 मे 2024 रोजी जागतिक मोहर उमटविण्यात आली आहे. नॉर्थ अमेरिकेतील "आंबेडकराईट असोसिएशन " या संस्थेचा 2024 सालचा विशेष पुरस्कार भारतातील सुप्रसिद्ध लेखक ज. वि. पवार यांना त्यांच्या अनुपस्थितीत देण्यात आला . आंबेडकराईट असोसिएशन ऑफ नोर्थ अमेरिका (AANA ) ही संस्था दरवर्षी सामाजिक क्षेत्रात ठसा उमटवणाऱ्या एका व्यक्तीस डॉ. आंबेडकर पुरस्कार देऊन सन्मानित करीत असते. यावर्षी ज. वि. पवार यांनी उद्दीपित केलेल्या चळवळीचा, त्यांनी लिहिलेल्या



ग्रंथसंपदेचा तसेच समाज उन्नयनासाठी दिलेल्या जगभरातील व्याख्यानांच्या सन्मानार्थ हा पुरस्कार देण्यात आला आहे . हा पुरस्कार म्हणजे पवार यांनी प्रगल्भित केलेल्या आंबेडकरवादाचा सन्मान आहे. ज.वी. पवार यांनी आंबेडकरवादाची कधीही कास सोडली नाही. उभे आयुष्य त्यांनी केवळ आंबेडकरवादाची जपणूक केली आहे . ज . वी. पवार यांची ग्रंथसंपदा मराठी, हिंदी, इंग्रजी व भारतातील अनेक प्रादेशिक भाषेत प्रसिद्ध झाली असून अनेक विद्यापीठातील अभ्यासक त्यांच्या चळवळीवर व साहित्यावर प्रबंध लिहीत आहेत. त्यांच्या कवितांचा आणि ग्रंथांचा समावेश अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेला आहे. आजही ते सतत क्रियाशील असून आंबेडकरवादी चळवळीत अत्यंत सक्रिय आहेत. त्यांच्याच आशीर्वादाने अपरांत साहित्य कला प्रबोधिनी या साहित्य विषयक संस्थेचा उदय झालेला आहे. त्यांना मिळालेल्या या जागतिक पुरस्काराबद्दल आंबेडकरी चळवळीतून तसेच समाजाच्या सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )